## आजचे पंचांग

शुक्रवार, दि. ५ जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, पंचमी रात्री ९-२१ पर्यंत नंतर षष्ठी तिथी, दिवस नक्षत्र– श्रवण अहोरात्र
चंद्र रास - मकर, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - कर्क

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## पुण्यात दिवसाआड पाणी?

**पुणे** : नैर्ऋत्य मान्सूनचा पाऊस या वर्षी कमी पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केल्याने पाणीबचतीचा खबरदारीचा उपाय म्हणून शहरात दिवसाआड पाणीकपात करण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने आयुक्तांपुढे मंजुरीसाठी ठेवला आहे. त्यावर महापालिका आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, येत्या आठवड्यातच दिवसाआड पाणीकपातीवर शिक्कामोर्तब होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ०५ जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २५० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### पहलाज निहलानी यांचे निधन

**मुंबई** : केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे गुरुवारी निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. १० जानेवारी १९५० रोजी जन्मलेल्या निहलानी यांनी १९८२ मध्ये 'हाथकडी' या चित्रपटातून निर्माता म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. १९८६ मध्ये आलेल्या 'इल्झाम' या चित्रपटाद्वारे अभिनेता गोविंदाला पहिला मोठा ब्रेक देण्याचे श्रेय त्याला दिले जाते.

### पाच उमेदवार बिनविरोध विजयी

**मुंबई** : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या १७ जागांसाठी सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेत उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. महायुतीने अनेक ठिकाणी बंडखोरी शमवण्यात यश मिळविले, तर महाविकास आघाडीच्या काही उमेदवारांनी संख्याबळ आणि राजकीय समीकरणांचा दाखला देत माघार घेतली. परिणामी राज्यातील पाच मतदारसंघांत उमेदवार बिनविरोध निवडून आले असून उर्वरित १२ ठिकाणी निवडणुकीची लढत होणार आहे.

### उत्तर प्रदेशात अग्निवीर जवान बेपत्ता

**मुझफ्फरनगर (उत्तर प्रदेश)** : मुझफ्फरनगर जिल्ह्यातील आपल्या मूळ गावातून सुट्टीवर घरी आलेला अग्निवीर जवान बेपत्ता झाला आहे. अर्जुन शर्मा (वय २३) हा बिरालसी गावचा रहिवासी असून बुधवारी फिरायला गेल्यानंतर तो घरी परत येऊ शकला नाही, अशी माहिती त्याच्या कुटुंबीयांनी दिली. पोलिसांनी तातडीने शोध मोहीम सुरू केली असून बेपत्ता जवानाचा शोध घेतला जात आहे.

### चार दिवसांच्या विलंबानंतर पावसाळ्याला अधिकृत सुरुवात

# केरळमध्ये मान्सूनचे अखेर आगमन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : देशभरातील शेतकरी आणि नागरिक ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते, त्या नैऋत्य मोसमी पावसाचे अखेर केरळमध्ये आगमन झाले आहे. भारतीय हवामान विभागाने गुरुवारी केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा करत देशातील चार महिन्यांच्या पावसाळी हंगामाला सुरुवात झाल्याचे जाहीर केले. यंदा मान्सूनच्या आगमनाला नेहमीपेक्षा चार दिवसांचा विलंब झाला असून १ जूनऐवजी ४ जून रोजी त्याने केरळमध्ये प्रवेश केला आहे.

यापूर्वी हवामान विभागाने २६ मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज व्यक्त केला होता. त्यानंतर हवामानातील बदलांमुळे हा अंदाज सुधारित करण्यात आला आणि २ ते ४ जूनदरम्यान मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. अखेर गुरुवारी मान्सूनच्या आगमनावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले.

देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी नैऋत्य मान्सून अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. जून ते सप्टेंबर या कालावधीत पडणारा मान्सूनचा पाऊस देशाच्या वार्षिक पर्जन्यमानापैकी सुमारे ७० टक्के वाटा उचलतो. भात, मका, कापूस, सोयाबीन, ऊस यांसारख्या खरीप पिकांसाठी हा पाऊस जीवनदायी मानला जातो. त्यामुळे मान्सूनचे आगमन हे केवळ हवामानशास्त्रीय घटना नसून देशाच्या अर्थकारणाशी आणि अन्नसुरक्षेशीही थेट संबंधित आहे.

मान्सूनने सध्या संपूर्ण केरळसह तामिळनाडूच्या काही भागांपर्यंत मजल मारली असून पुढील काही दिवसांत तो कर्नाटक, गोवा आणि दक्षिण भारतातील अन्य प्रदेशांमध्ये वेगाने पुढे सरकण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. जूनअखेरीस मान्सून देशाच्या बहुतांश भागात पोहोचेल, असा अंदाज आहे.

दरम्यान, मान्सूनच्या आगमनासोबतच केरळमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने अलाप्पुझा, कोट्टायम आणि एर्नाकुलम जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या भागांत मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तिरुवनंतपुरम, कोल्लम, पथनमथिट्टा, इडुक्की आणि त्रिशूर जिल्ह्यांमध्येही मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मान्सूनच्या पुढील वाटचालीकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. उत्तर भारतातील उष्णतेने होरपळलेल्या राज्यांना मान्सूनमुळे मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

# सरकारविरोधात संस्थात्मक असंतोष वाढला : राहुल गांधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत गंभीर दावे करत देशात संस्थात्मक असंतोष वाढत असल्याचा आरोप केला आहे. एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी पुढील एका वर्षात देशाच्या राजकारणात मोठे बदल होऊ शकतात, असा दावा करत सरकारसमोर गंभीर आव्हाने उभी राहतील, असे म्हटले.

राहुल गांधी यांनी दावा केला की, सरकारच्या नियंत्रणाखाली असल्याचे मानल्या जाणाऱ्या विविध संस्थांमध्ये आता अस्वस्थता निर्माण होत आहे. निवडणूक आयोग, गुप्तचर यंत्रणा, न्यायव्यवस्था आणि इतर संस्थांतील काही व्यक्तींकडून नाराजी व्यक्त होत असल्याचे संदेश आपल्याला मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या मते, पूर्वी पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे मानल्या जाणाऱ्या संस्था आता स्वतंत्रपणे विचार करू लागल्या असून व्यवस्थेच्या आतूनच विरोधाचे स्वर उमटत आहेत.

देशाच्या अर्थव्यवस्थेबाबतही राहुल गांधी यांनी इशारा दिला. त्यांनी केंद्र सरकारवर अर्थव्यवस्थेचे संरक्षण करणाऱ्या यंत्रणा कमकुवत केल्याचा आरोप करत आगामी काळात देशाला मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो, असे म्हटले.

राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर भाजपने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. भाजपने त्यांच्या विधानांना भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले असून भारताची अर्थव्यवस्था जागतिक आव्हानांनंतरही सक्षम असल्याचा दावा केला आहे. भाजप नेत्यांनी राहुल गांधी यांच्या विधानांना राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगत त्यावर टीका केली आहे.

# काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे निधन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार अनंतराव थोपटे यांचे गुरुवारी निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. अल्पशा आजाराने उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने राज्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.


अनंतराव थोपटे यांनी अनेक दशकांपर्यंत भोर विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व केले. राज्य मंत्रिमंडळात त्यांनी कॅबिनेट मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली होती. तसेच पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले.

राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर राज्यातील काँग्रेस पक्षाला मोठे आव्हान निर्माण झाले होते. त्या काळात अनंतराव थोपटे यांनी काँग्रेसच्या विधिमंडळ गटाचे नेतृत्व करत पक्ष संघटना मजबूत ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

### इयत्ता दुसरी ते सहावीच्या अभ्यासक्रमात बदल

# नवी पाठ्यपुस्तके ३० जूनपर्यंत विद्यार्थ्यांच्या हाती

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीची पाठ्यपुस्तके नव्याने प्रकाशित करण्यात येत असून ती ३० जूनपर्यंत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहेत. बालभारतीच्या इतिहासात प्रथमच एका वर्षात चार इयत्तांची पाठ्यपुस्तके बदलली जात असून हीरक महोत्सवी वर्षानिमित्त ही पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करण्यात येत असल्याची माहिती बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक यांनी दिली.

पत्रकार परिषदेत बोलताना ओक म्हणाल्या की, नव्याने प्रकाशित करण्यात आलेल्या दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या पुस्तकांपैकी सुमारे ७८ टक्के पुस्तकांचे वितरण पूर्ण झाले आहे. याशिवाय समग्र शिक्षा अभियानाच्या माध्यमातून सुमारे सहा कोटी पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना मोफत वितरित करण्यात येणार आहेत.

नवीन पाठ्यपुस्तकांची निर्मिती प्रक्रिया बहुपातळी पडताळणी आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली आहे. यामध्ये तज्ज्ञ समित्यांची नियुक्ती, आशयनिर्मिती, चित्रांकन, गाभा समितीद्वारे परीक्षण, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून मान्यता तसेच विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने स्वतंत्र पडताळणी अशा विविध टप्प्यांचा समावेश करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या वयानुसार आणि क्षमतानुसार पाठ्यपुस्तकांचा आशय निश्चित करण्यात आला असून अध्ययन निष्पत्ती आणि क्षमताधारित शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. प्रत्येक पुस्तकाच्या सुरुवातीला अध्ययन निष्पत्ती आणि आशय यांचा परस्परसंबंध स्पष्ट करणारा तक्ता देण्यात आला आहे. तसेच शिक्षकांसाठी अध्यापनाच्या सूचना आणि प्रत्येक पाठासाठी मार्गदर्शक टिप्सही समाविष्ट करण्यात आल्या आहेत. नवीन पुस्तकांसाठी ७० जीएसएम दर्जाच्या कागदाचा वापर करण्यात आला असून मुखपृष्ठासाठी १७० जीएसएम कागद वापरण्यात आला आहे. पुस्तकांवर वॉटरमार्क, मुद्रकांची माहिती असलेले क्यूआर कोड, बालभारतीच्या हीरक महोत्सवी वर्षाचा लोगो तसेच टेली-मानस, मनोदर्पण, चाइल्ड हेल्पलाईन १०९८ आणि राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाच्या ई-बॉक्सविषयी माहिती देण्यात आली आहे. पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती गेल्यानंतर त्यामध्ये कोणतीही त्रुटी आढळल्यास किंवा सुधारणा सुचवायच्या असल्यास नागरिकांनी बालभारतीशी संपर्क साधावा, असे आवाहन अनुराधा ओक यांनी केले. प्राप्त सूचनांचा तज्ज्ञ समितीकडून विचार करून आवश्यक असल्यास पुढील आवृत्त्यांमध्ये सुधारणा करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### प्रकरणांच्या जलद निकालीसाठी

# मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यास सर्वोच्च नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशभरातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांचा वेळबद्ध निपटारा करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. अशा प्रकारचे सर्वंकष निर्देश देणे हे न्यायालयीन आणि प्रशासकीय धोरणांशी संबंधित प्रकरण असल्याचे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांचा प्रश्न गंभीर असला तरी त्यासाठी एकसमान कालमर्यादा निश्चित करणे व्यवहार्य नाही. प्रत्येक खटल्याचे स्वरूप, पुरावे, पक्षकारांची संख्या आणि कायदेशीर गुंतागुंत वेगवेगळी असते. त्यामुळे सर्व प्रकारच्या प्रकरणांसाठी एकच वेळमर्यादा लागू करणे शक्य नसल्याचे न्यायालयाने नमूद केले.

याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयाकडे देशभरातील न्यायालयांना खटल्यांचा निश्चित कालावधीत निपटारा करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली होती. तसेच प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहू नयेत यासाठी स्वतंत्र मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, न्यायव्यवस्थेतील प्रलंबित खटल्यांची समस्या सोडविण्यासाठी विविध पातळ्यांवर सातत्याने उपाययोजना सुरू आहेत. न्यायाधीशांची संख्या वाढविणे, तंत्रज्ञानाचा वापर, ई-कोर्ट व्यवस्था, खटल्यांचे व्यवस्थापन आणि रिक्त पदे भरणे यांसारख्या उपायांवर भर दिला जात आहे.

न्यायालयाने असेही निरीक्षण नोंदविले की, न्यायदान प्रक्रियेत घाई करून न्यायाच्या गुणवत्तेशी तडजोड करता येणार नाही. प्रत्येक प्रकरणाचा सखोल विचार करूनच निर्णय देणे आवश्यक असते. त्यामुळे केवळ कालमर्यादेच्या आधारे न्यायालयांच्या कामकाजावर बंधने घालणे योग्य ठरणार नाही. देशातील न्यायालयांमध्ये लाखो प्रकरणे प्रलंबित असून त्यातील मोठा हिस्सा जिल्हा न्यायालये आणि उच्च न्यायालयांमध्ये आहे. प्रलंबित खटल्यांचा वाढता आकडा हा न्यायव्यवस्थेसमोरील मोठा प्रश्न मानला जात असला, तरी त्यावर उपाय शोधण्याची जबाबदारी न्यायपालिका, सरकार आणि संबंधित संस्थांनी समन्वयाने पार पाडण्याची गरज असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले.

### विक्रम काकडे यांचा विजय निश्चित

**पुणे** : पुणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विक्रम काकडे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी सर्व प्रतिस्पर्धी उमेदवारांनी माघार घेतल्याने काकडे यांचाच एकमेव अर्ज शिल्लक राहिला आहे. निवडणूक आयोगाकडून अधिकृत घोषणा २२ जून रोजी होणार असली, तरी त्यांच्या विजयावर आता शिक्कामोर्तब झाल्याचे मानले जात आहे. महायुतीचा धर्म पाळत प्रदीप कंद यांनी आपला अर्ज मागे घेतला. मतदारसंख्येचे गणित लक्षात घेऊन श्रीकांत पाटील यांनीही माघार घेतली.

# ललित मोदींच्या दाव्याने नवा वाद

### शशी थरूरांना कोणाचे संरक्षण होते?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : इंडियन प्रीमियर लीगच्या इतिहासातील गाजलेल्या कोची टस्कर्स केरळ फ्रँचायझी वादाला पुन्हा एकदा उजाळा मिळाला आहे. आयपीएलचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी एका मुलाखतीत काँग्रेसच्या तत्कालीन नेतृत्वावर आणि काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्यावर गंभीर आरोप करत नव्या राजकीय चर्चेला तोंड फोडले आहे.

एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ललित मोदी यांनी दावा केला की, कोची टस्कर्स केरळ फ्रँचायझीच्या मालकी हक्क आणि आर्थिक व्यवहारांबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर तत्कालीन संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमधील अनेक प्रभावशाली नेते त्यांच्या विरोधात उभे राहिले होते. या प्रकरणात तत्कालीन काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी शशी थरूर यांना पाठिंबा दिल्याचा आरोपही त्यांनी केला. शशी थरूर यांना नेमके कोणाचे पाठबळ होते, असा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर ललित मोदी यांनी थेट सोनिया गांधी यांचे नाव घेतले. त्या काळात आपल्यावर सर्व बाजूंनी दबाव आणला जात होता, असा दावा करत त्यांनी अहमद पटेल, प्रणब मुखर्जी आणि राजीव शुक्ला यांच्याकडूनही संपर्क साधला जात असल्याचे म्हटले.

कोची टस्कर्स केरळ फ्रँचायझीबाबत बोलताना ललित मोदी यांनी या संघाच्या आर्थिक रचनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ३५० दशलक्ष डॉलर्सची बोली लावून फ्रँचायझी मिळविणाऱ्या समूहाच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकतेचा अभाव होता. सुनंदा पुष्कर यांना कोणतीही आर्थिक गुंतवणूक न करता २५ टक्के इक्विटी दिली जात होती. या व्यवहाराबाबत शंका उपस्थित केल्यानंतर आपण अंतिम करारावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला होता, असे त्यांनी सांगितले.

### अपूर्ण कामांमुळे कोकणवासीयांमध्ये संताप

# मुंबई-गोवा महामार्गाची मुदत पुन्हा एकदा हुकली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : कोकणवासीयांच्या जिव्हाळ्याचा आणि गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेला मुंबई-गोवा महामार्ग पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी ३१ मेपर्यंत महामार्गाचे रुंदीकरण पूर्ण होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, जून महिना सुरू झाला तरी महामार्गावरील अनेक महत्त्वाची कामे अपूर्णच असल्याने कोकणवासीयांच्या पदरी पुन्हा निराशाच पडली आहे.
यंदाच्या पावसाळ्यापूर्वी महामार्गावरील सर्व कामे पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी चौपदरीकरण, उड्डाणपूल, सर्व्हिस रस्ते आणि बायपासची कामे अद्यापही रखडलेली आहेत. त्यामुळे यंदाचाही पावसाळा प्रवाशांना खड्डेमय आणि अपूर्ण महामार्गावरूनच प्रवास करत काढावा लागणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.
महामार्गाचे काम पूर्ण होण्यापूर्वीच खारपाडा येथे टोलवसुली सुरू करण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. महामार्गावरील मूलभूत सुविधा आणि सुरक्षा उपाययोजना पूर्ण झालेल्या नसताना टोल आकारला जात असल्याबद्दल प्रवासी आणि स्थानिक नागरिकांनी वारंवार आक्षेप नोंदविला आहे. मात्र, विरोधानंतरही टोलवसुली सुरूच ठेवण्यात आली आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम २०११ पासून सुरू आहे. गेल्या १५ वर्षांत अनेक कंत्राटदार बदलले, विविध कंपन्यांनी कामे हाती घेतली, तरीही महामार्ग पूर्णत्वास पोहोचलेला नाही. त्यामुळे हा प्रकल्प राज्यातील सर्वाधिक विलंब झालेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक ठरला आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक महत्त्वाची कामे अद्याप प्रलंबित आहेत. माणगाव आणि इंदापूर बायपासचे काम पूर्ण झालेले नाही. कोलाडजवळील उड्डाणपुलाचे कामही रखडले असून अनेक ठिकाणी सर्व्हिस रस्ते आणि गावांना जोडणारे अंतर्गत मार्ग अपूर्ण अवस्थेत आहेत. माणगाव आणि इंदापूर बायपास मिळून सुमारे दहा किलोमीटर अंतराचे काम अद्याप बाकी असल्याची माहिती समोर आली आहे. रायगड जिल्ह्यात मुंबई-गोवा महामार्गाचे एकूण १४० किलोमीटर अंतर असून त्यापैकी सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ३० टक्के काम अद्याप प्रलंबित आहे. अनेक ठिकाणी एकेरी वाहतूक सुरू असल्याने अपघातांचा धोका वाढला असून प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. महामार्गावरील उड्डाणपूल, सर्व्हिस रस्ते आणि महत्त्वाचे बायपास अपूर्ण असताना ३१ मेची मुदत कोणत्या आधारावर जाहीर करण्यात आली होती, असा सवाल आता कोकणवासीयांकडून उपस्थित केला जात आहे.
दरवर्षी पावसाळ्यापूर्वी आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. पावसाळा तोंडावर असताना महामार्गावरील अपूर्ण कामांमुळे वाहतूक कोंडी, अपघात आणि प्रवासातील अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# डीएमकेचा इंडिया आघाडी बैठकीवर बहिष्कार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : तमिळनाडूतील विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसने घेतलेल्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत द्रविड मुन्नेत्र कळघमने ८ जून रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या 'इंडिया' आघाडीच्या बैठकीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेसने निवडणुकीनंतर केलेल्या राजकीय भूमिकेमुळे पक्षाचे कार्यकर्ते अद्यापही दुखावले असल्याचे द्रमुकने स्पष्ट केले आहे.

तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेता विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम पक्षाने उल्लेखनीय यश मिळवत १०८ जागांवर विजय मिळविला. या निकालामुळे द्रमुकला सत्तेबाहेर जावे लागले. निवडणुकीनंतर काँग्रेसने सर्वप्रथम विजय यांच्या पक्षाला पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर डावे पक्ष, काही लहान पक्ष तसेच अण्णाद्रमुकच्या काही आमदारांनीही विजय यांच्या नेतृत्वाखालील आघाडीला पाठिंबा दिला. काँग्रेस हा अनेक वर्षांपासून द्रमुकचा प्रमुख मित्रपक्ष राहिला आहे. तमिळनाडूची विधानसभा निवडणूकही दोन्ही पक्षांनी एकत्रितपणे लढवली होती. त्यामुळे निकालानंतर काँग्रेसने विजय यांच्या पक्षासोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने द्रमुकमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे.

द्रमुकने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, तमिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाने घेतलेल्या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन पक्षाने 'इंडिया' आघाडीच्या बैठकीत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे.

## संपादकीय

# शिक्षण व्यवस्थेचा निर्दयी खेळ




**केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या उत्तरपत्रिका तपासणी प्रक्रियेतील भोंगळ कारभार एका बारावीच्या विद्यार्थ्याने पुराव्यांसह उघडकीस आणला आहे. ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे.**

नालंदा आणि तक्षशिलेचे दाखले देऊन भूतकाळाच्या रम्य आठवणींत जगण्याची आपल्याला एक अजब सवय जडली आहे. परंतु, वर्तमानात आपली शिक्षण व्यवस्था किती कुजलेली आणि बकाल आहे, याकडे आपण सर्वच जण जाणीवपूर्वक डोळेझाक करत असतो. एकीकडे आपण 'एकविसावे शतक भारताचे असेल' असा घोष करत असतो, आणि दुसरीकडे एका सतरा-अठरा वर्षांच्या विद्यार्थ्याला आपल्याच शिक्षण व्यवस्थेतील निविदा प्रक्रियेत दडलेला गबाळेपणा चव्हाट्यावर आणावा लागतो, याहून मोठा विरोधाभास तो कोणता? सार्थक सिद्धांत या 'सीबीएसई'च्या विद्यार्थ्याने 'ऑन-स्क्रीन मार्किंग' प्रणालीच्या निविदेतील त्रुटी ज्या सविस्तर पद्धतीने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत, ते पाहता या व्यवस्थेची बौद्धिक दिवाळखोरी पूर्णपणे उघडी पडली आहे. ही निविदा प्रक्रिया राबवताना ज्या अटी आणि शर्ती घातल्या गेल्या, त्यातील विसंगती एका शाळकरी मुलाने शोधून काढाव्यात, यातून आपल्या शिक्षण मंडळाचा दर्जा किती सुमार आहे, हेच सिद्ध होते. आजकाल प्रत्येक समस्येवर 'तंत्रज्ञान' हेच एकमेव उत्तर असल्याचा एक अत्यंत बाळबोध आणि स्वतःच्या सोयीचा समज आपल्या प्रशासकीय व्यवस्थेत रूढ झाला आहे. उत्तरपत्रिका तपासणीत मानवी चुका टाळण्यासाठी 'ओएसएम'सारखी संगणकीय प्रणाली आणली गेली. संकल्पना म्हणून ती नक्कीच स्वागतार्ह आहे. पण तंत्रज्ञान कितीही प्रगत असले, तरी ते राबवणारे हात आणि डोकी तीच जुनी, गंजलेली आणि भ्रष्ट असतील, तर हाती काय लागणार? कोट्यवधी रुपयांची कंत्राटे देऊन ज्या खासगी कंपन्यांची या कामासाठी निवड केली जाते, त्यांची क्षमता आणि विश्वासार्हता तपासण्याची कोणतीही पारदर्शक यंत्रणा या देशात अस्तित्वात नाही. निविदा प्रक्रियेतील अटी अशा प्रकारे वळवल्या जातात की ठराविक कंत्राटदारांचेच उखळ पांढरे व्हावे. यात आपण लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत आहोत, याचे साधे भानही या मुजोर नोकरशाहीला उरलेले नाही. तांत्रिक बिघाड, सदोष स्कॅनिंग आणि चुकीचे गुणदान यामुळे दरवर्षी हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याची जी होळी होते, त्याची जबाबदारी घेणार कोण? हे 'सीबीएसई'पुरता मर्यादित नाही, तर आपल्या संपूर्ण व्यवस्थेच्या नसानसात ही मानसिकता भिनलेली आहे. 'नीट' परीक्षेचा नुकताच चव्हाट्यावर आलेला गैरव्यवहार हे याच प्रदीर्घ आजाराचे आणखी एक भयंकर लक्षण आहे. 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'सारख्या संस्था आपण मोठ्या दिमाखात उभ्या केल्या. पण या संस्था म्हणजे आतून पूर्णपणे पोखरलेली आणि भ्रष्टाचाराची वाळवी लागलेली लाकडे आहेत, हे आता लपून राहिलेले नाही. परीक्षा पद्धतीमधील या अनागोंदीमुळे व्यवस्थेवर डोळे झाकून विश्वास ठेवून प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाट्याला निव्वळ नैराश्य आणि संताप येतो. आपल्या पाल्याला प्रतिष्ठित महाविद्यालयात प्रवेश मिळावा, यासाठी पालक आपल्या आयुष्याची पुंजी पणाला लावतात. विद्यार्थी स्वतःला खोलीत कोंडून घेत यंत्रासारखा अभ्यास करतात. ज्या व्यवस्थेच्या हातात आपण आपले भविष्य सोपवत आहोत, ती व्यवस्था किती पारदर्शक आहे, याचा जाब विचारण्याचे धारिष्ट्य हा मध्यमवर्ग कधीही दाखवत नाही. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमागे निव्वळ कौटुंबिक दबाव नाही, तर या व्यवस्थेचा हा थंड आणि निर्दयी दृष्टिकोनही तितकाच कारणीभूत आहे. प्रशासकीय गैरकारभार आणि खासगी कंत्राटदारांचे आर्थिक हितसंबंध यात विद्यार्थ्यांचे भविष्य हे निव्वळ एका 'कच्च्या माला'सारखे वापरले जात आहे, हे नाकारता येत नाही. सार्थक सिद्धांतने उपस्थित केलेले प्रश्न हे एका यंत्रणेच्या मुळावर घाव घालणारे आहेत. शिक्षण हे कोणतेही टेंडर काढून कंत्राटदारांचे खिसे भरण्याचे कुरण नाही, तर ती एक अत्यंत गंभीर आणि राष्ट्रीय महत्त्वाची प्रक्रिया आहे. सरकारने आणि न्यायव्यवस्थेने या प्रकरणाची आता अत्यंत गंभीर दखल घेण्याची वेळ आली आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राचे झालेले हे बाजारीकरण तत्काळ थांबवणे आवश्यक आहे. जो देश आपल्या विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचा सन्मान करण्याऐवजी त्यांना व्यवस्थेतील तांत्रिक त्रुटी शोधायला भाग पाडतो, त्या देशाचे भविष्य कायम अंधकारमय असते. या भ्रष्ट व्यवस्थेला लगाम न घातल्यास, उद्याचा इतिहास आपल्याला कधीही माफ करणार नाही, हे वास्तव जितक्या लवकर आपण स्वीकारू, तितके ते आपल्या सर्वांच्याच हिताचे ठरेल.

# शेतकऱ्यांचा आक्रोश आणि वास्तवाचे भान

**» निसर्गाचा लहरीपणा आणि सरकारी अनास्था या दुहेरी संकटात सापडलेल्या बळीराजाचा आक्रोश आता शिगेला पोहोचला आहे. कृषीव्यवस्थेच्या या वास्तवाचा आज गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.**



भारत हा कृषिप्रधान देश असल्याचे आपण नेहमीच अत्यंत अभिमानाने सांगत असतो. परंतु, या देशाचा खरा पोशिंदा असलेला शेतकरी आज हतबल होऊन रस्त्यावर उतरून आपल्या न्याय्य हक्कांसाठी आक्रोश करत आहे, हे अत्यंत विदारक वास्तव आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानंतरही शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांची कायमस्वरूपी सोडवणूक झालेली नाही, ही आपल्या प्रशासकीय व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका मानावी लागेल. आजचा शेतकरी एका बाजूला निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकला आहे, तर दुसऱ्या बाजूला बाजारपेठेतील अनिश्चितता आणि सरकारी धोरणांच्या जाळ्यात तो भरडला जात आहे. आधीच अवकाळी पाऊस आणि गारपिटीने खरिपाचे अतोनात नुकसान झालेले असताना, आता आगामी हंगामावर 'अल निनो'चे भयंकर संकट घोंघावत आहे. अल निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटण्याची आणि देशात भीषण कोरडा दुष्काळ पडण्याची मोठी शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. निसर्गाच्या या लहरीपणामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला जातो.

शेतीचा दिवसेंदिवस वाढता उत्पादन खर्च आणि पिकवलेल्या शेतमालाला मिळणारा अत्यंत नीचांकी हमीभाव, हा या संतापाचा आणि आक्रोशाचा मुख्य गाभा आहे. शेतीसाठी लागणारी रासायनिक खते, दर्जेदार बियाणे, कीटकनाशके आणि मजुरी यांचे दर आज गगनाला भिडले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात डिझेल महाग झाल्यामुळे ट्रॅक्टर चालवण्याचा आणि शेतमालाच्या वाहतुकीचा खर्च सामान्य शेतकऱ्याच्या पूर्णपणे आवाक्याबाहेर गेला आहे. मात्र, या प्रचंड आर्थिक खर्चातून रक्ताचे पाणी करून पिकवलेल्या शेतमालाला जेव्हा प्रत्यक्ष बाजारात विक्रीसाठी नेले जाते, तेव्हा व्यापाऱ्यांच्या साखळीकडून त्याची अक्षरशः मातीमोल भावाने खरेदी केली जाते. भाव अचानक पडल्यावर नाईलाजाने शेतकऱ्याला आपला चांगला माल रस्त्यावर फेकून देण्याची भयंकर वेळ येते, हे चित्र कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी अत्यंत लाजिरवाणे आणि क्लेशदायक आहे. महागाई नियंत्रणात ठेवण्याच्या गोंडस नावाखाली सरकार अनेकदा शेतमालाच्या निर्यातीवर अचानक बंदी घालते किंवा परदेशातून अत्यंत स्वस्त कृषीमालाची देशात आयात करते. या धोरणामुळे शहरी ग्राहकांना तात्पुरता स्वस्त माल मिळतो, पण शेतकरी मात्र कायमस्वरूपी आर्थिक खाईत निर्दयीपणे लोटला जातो.

शेतकऱ्यांचा हा उद्वेग आणि आक्रोश निव्वळ रस्त्यावरील आंदोलनांपुरता किंवा मोर्चांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आज वाढत्या शेतकरी आत्महत्यांमधून अत्यंत भयंकर आणि अमानवीय स्वरूपात समोर येत आहे. वाढता उत्पादन खर्च आणि उत्पन्नाची मोठी अनिश्चितता यामुळे शेतकरी कर्जाच्या भीषण सापळ्यात अडकतो. राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज आणि सावकाराचा तगादा यामुळे होणाऱ्या मानसिक कोंडीतून तो थेट मृत्यूला कवटाळतो. याच पार्श्वभूमीवर, नुकत्याच जाहीर झालेल्या कर्जमाफीच्या निर्णयाचे गांभीर्याने विश्लेषण करणे गरजेचे आहे. अशा राजकीय घोषणांमधून मूळ आजारावर कोणताही कायमस्वरूपी उपाय निघत नाही. कर्जमाफी हा आजारावरील निव्वळ एक तात्पुरता मलमपट्टीचा प्रकार आहे. जोपर्यंत शेती हा व्यवसाय खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि पूर्णपणे स्वावलंबी बनत नाही, तोपर्यंत कर्जमाफीची ही साखळी अशीच अव्याहतपणे सुरू राहील.

या संकटातून बाहेर पडण्यासाठी सरकारी आणि धोरणात्मक पातळीवर अत्यंत आमूलाग्र बदल करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. शेतमालाला त्याच्या उत्पादन खर्चावर आधारित योग्य आणि कायदेशीर हमीभाव मिळणे, हा प्रत्येक शेतकऱ्याचा मूलभूत हक्क आहे. कृषीमालावर प्रक्रिया करणारे छोटे उद्योग थेट गावपातळीवर उभे राहिले पाहिजेत, जेणेकरून शेतकऱ्याला मूल्यवर्धनाचा थेट आर्थिक फायदा मिळू शकेल. सिंचनाच्या शाश्वत सोयी, शेतीसाठी अखंडित वीज आणि 'अल निनो'सारख्या हवामान बदलाचा सामना करू शकणारे प्रगत तंत्रज्ञान बांधापर्यंत पोहोचवणे आज गरजेचे आहे. कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधांचे जाळे अधिक भक्कम केल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. दलालांची साखळी मोडून काढून थेट ग्राहकांपर्यंत माल पोहोचवण्याची पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी लागेल. शेतकऱ्यांच्या अहोरात्र गाळलेल्या घामाला जेव्हा खऱ्या अर्थाने प्रतिष्ठा मिळेल आणि त्यांच्या कष्टाला बाजारात योग्य दाम मिळेल, तेव्हाच त्यांच्या मनातील हा आक्रोश खऱ्या अर्थाने शांत होईल. अन्यथा, बळीराजाचा हा संताप व्यवस्थेला हादरवून सोडेल.

# पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाला लवकरच गती

## केंद्र सरकारकडून २५ टक्के निधी मिळणार; प्रकल्पाच्या खर्चात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** गेल्या १५ वर्षांपासून रखडलेल्या पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाला अखेर गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज फंडातून या प्रकल्पासाठी २५ टक्के निधी मिळण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून निधी प्राप्त होताच निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाणार आहे. सुमारे ४०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचा खर्च वाढून आता तब्बल १ हजार २०० कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

महापालिकेला प्रकल्पासाठी केंद्राकडून केवळ २५ टक्के निधी उपलब्ध होणार असून उर्वरित ७५ टक्के निधी स्वतः उभारावा लागणार आहे. त्यासाठी म्युनिसिपल बॉण्डद्वारे निधी उभारण्याबरोबरच वित्तीय संस्था आणि राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज घेण्याचाही पर्याय विचाराधीन आहे. यापूर्वी मुळा नदी सुधार प्रकल्पासाठी २०० कोटी रुपयांचे म्युनिसिपल बॉण्ड आणि हरितसेतू प्रकल्पासाठी २०० कोटी रुपयांचे ग्रीन बॉण्ड काढण्यात आले होते. त्यानंतर आता तिसऱ्यांदा बॉण्डच्या माध्यमातून निधी उभारण्याची शक्यता आहे.

तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या कार्यकाळापासून या प्रकल्पासाठी अर्बन चॅलेंज फंडातून निधी मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, निधी मंजुरीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून त्यानंतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीला वेग दिला जाणार आहे. पवना जलवाहिनी प्रकल्पाला पिंपरी-चिंचवडमधील लोकप्रतिनिधींचा सुरुवातीपासून पाठिंबा आहे. मात्र, मावळमधील काही लोकप्रतिनिधींकडून या प्रकल्पाला विरोध होत होता. मावळचे आमदार सुनील शेळके आणि खासदार श्रीरंग बारणे यांनी यापूर्वी विरोधाची भूमिका घेतली होती. मात्र, खासदार बारणे यांनी अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रकल्पाबाबत तोडगा काढून काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

या प्रकल्पांतर्गत निगडी प्राधिकरणातील सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रापासून पवना धरणापर्यंत ३४.७१ किलोमीटर लांबीची आणि १८०० मिलिमीटर व्यासाची समांतर भूमिगत जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यापैकी शहर हद्दीतील ४.४० किलोमीटरचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ३०.३१ किलोमीटरचे काम बाकी आहे. या कामासाठी आवश्यक जमीन उपलब्ध असून धरणाजवळ अशुद्ध जलउपसा केंद्र, जॅकवेल, पंपिंग स्टेशन आणि ब्रेक प्रेशर टाकी उभारण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेल्याने पाण्याची मागणी सातत्याने वाढत आहे. शहरातील पाणीपुरवठा आणि जलशुद्धीकरण यंत्रणेवरील वाढत्या ताणामुळे गेल्या साडेसहा वर्षांपासून दोन दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे शहराच्या भविष्यातील पाणी गरजा पूर्ण करण्यासाठी पवना बंद जलवाहिनी प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहराला प्रदूषणविरहित आणि अधिक स्वच्छ पाणी उपलब्ध होणार आहे. सध्या पवना धरणातून ५५० एमएलडी पाणी उचलले जात असून प्रकल्पामुळे अतिरिक्त १०० एमएलडी पाणी उपलब्ध होईल.

# बसशेड असूनही प्रवासी उन्हात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपळे गुरवमध्ये पीएमपीएमएल प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका हजारो प्रवाशांना बसत आहे. लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली सुसज्ज बसशेड वापराविना पडून असताना नागरिकांना भर उन्हात पदपथावर उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

आकुर्डी रेल्वे स्थानक ते मनपा भवन, पिंपरी गाव ते मार्केट यार्ड, भोसरी ते भेकराईनगर, भोसरी ते कोथरूड डेपो तसेच आळंदी ते म्हाळुंगे या विविध मार्गांवरील पीएमपीएमएलच्या बसेस पूर्वी तुळजाभवानी मंदिराच्या अलीकडील मार्गाने धावत होत्या. या मार्गावरील पिंपळे गुरव बसस्थानकाबाहेरील थांब्यावर प्रवाशांच्या सुविधेसाठी दोन बसशेड उभारण्यात आले होते. मात्र, प्रशासनाने बसमार्गात बदल करून बसेस तुळजाभवानी मंदिराच्या पलीकडील मार्गाने वळविल्याने या बसशेडचा उपयोगच बंद झाला आहे.

नव्या थांब्याच्या ठिकाणी कोणतीही मूलभूत सुविधा नसल्याने प्रवाशांना पदपथावर उभे राहून बसची वाट पाहावी लागत आहे. हा मार्ग अत्यंत वर्दळीचा असल्याने वाहनांची सतत ये-जा सुरू असते. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्याच्या कडेला जीव मुठीत धरून उभे राहण्याची वेळ नागरिकांवर आली असून अपघाताचा धोका वाढला आहे. नव्या थांब्याच्या ठिकाणी कोणतीही संरक्षणात्मक व्यवस्था करण्यात आलेली नाही.

# दोन महिन्यांत २५ हजार नवीन पीएनजी जोडण्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** मध्य-पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली एलपीजी सिलिंडरची टंचाई आणि शासनाने पीएनजी वापराला दिलेले प्रोत्साहन यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात पाइप नॅचरल गॅस (पीएनजी) जोडणी घेणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने (एमएनजीएल) गेल्या दोन महिन्यांत विक्रमी २५ हजार नवीन पीएनजी जोडण्या दिल्या आहेत.

एमएनजीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च महिन्यात पुणे आणि परिसरात सुमारे ११ हजार नवीन पीएनजी जोडण्या देण्यात आल्या होत्या. मात्र, १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत कंपनीने स्वतःचाच विक्रम मोडीत काढत तब्बल २५ हजार नवीन जोडण्या दिल्या आहेत. त्यामुळे पीएनजीच्या दैनंदिन जोडण्यांमध्ये मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे.

केंद्र आणि राज्य सरकारने ज्या भागांमध्ये पीएनजी पाइपलाइनचे जाळे उपलब्ध आहे, त्या भागांतील नागरिकांनी पुढील तीन महिन्यांत एलपीजी सिलिंडरऐवजी पीएनजीचा वापर स्वीकारावा, असे निर्देश दिले आहेत. जागतिक स्तरावर द्रवीभूत नैसर्गिक वायूच्या वाहतुकीत काही अडथळे निर्माण होत असले तरी घरगुती पीएनजी ग्राहकांसाठी आवश्यक गॅसचा शंभर टक्के पुरवठा आरक्षित ठेवण्यात आल्याने गॅसपुरवठा अखंडित राहणार असल्याचे एमएनजीएलने स्पष्ट केले आहे. सध्या पुणे शहर आणि परिसरात एमएनजीएलच्या माध्यमातून ८ लाख ६६ हजार ६८९ ग्राहकांना पीएनजीचा पुरवठा केला जात आहे. वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी कंपनीने शहरातील सुमारे एक हजार गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये विशेष जनजागृती आणि नोंदणी शिबिरे आयोजित केली आहेत.

दरम्यान, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात एमएनजीएलचे सुमारे २ हजार ३८५ किलोमीटर लांबीचे पाइपलाइन जाळे विस्तारलेले आहे. वाढत्या ग्राहकसंख्येचा विचार करून कंपनीने पाइपलाइन विस्तार आणि सेवा क्षमतेत वाढ करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे अर्ज केल्यानंतर ग्राहकांना अल्पावधीत पीएनजी जोडणी उपलब्ध करून देणे शक्य होत असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले.

## विषारी दारूकांडानंतर पोलिस आयुक्तांचा कडक आदेश

# अवैध धंद्यांसाठी अधिकाऱ्यांनाच धरले जाणार जबाबदार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** फुगेवाडी विषारी दारूकांडात १७ जणांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभरात तीव्र पडसाद उमटले असून पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी अवैध धंद्यांविरोधात कठोर भूमिका घेत महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे. यापुढे पोलिस ठाण्यांच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध धंद्यांसाठी संबंधित अधिकारी थेट जबाबदार धरले जाणार आहेत.

फुगेवाडीतील दारूकांडानंतर अवैध दारूविक्री, मटका, जुगार, अंमली पदार्थ आणि अन्य बेकायदेशीर व्यवसायांवर नियंत्रण ठेवण्यात पोलिस यंत्रणेला आलेल्या अपयशावर टीका होत आहे. वरिष्ठ स्तरावरून वारंवार सूचना देऊनही काही भागांत अवैध धंदे सुरूच असल्याचे समोर आले. त्यामुळे या दुर्घटनेची गंभीर दखल घेत पोलिस आयुक्तालयाने जबाबदारी निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे.

नव्या आदेशानुसार प्रत्येक पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला दर महिन्याच्या पहिल्या तारखेला आपल्या हद्दीत कोणताही अवैध धंदा सुरू नसल्याचे लेखी प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे. हे प्रमाणपत्र केवळ औपचारिकता नसून संबंधित अधिकाऱ्याच्या वैयक्तिक जबाबदारीचे दस्तऐवज मानले जाणार आहे. भविष्यात संबंधित हद्दीत अवैध व्यवसाय सुरू असल्याचे आढळल्यास त्या अधिकाऱ्याला जबाबदारी झटकता येणार नाही. विशेष म्हणजे ही जबाबदारी केवळ वरिष्ठ पोलिस निरीक्षक किंवा प्रभारी अधिकाऱ्यांपुरती मर्यादित राहणार नाही. संबंधित पोलिस ठाण्यांवर देखरेख करणाऱ्या विभागीय सहायक पोलिस आयुक्तांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अवैध धंदे बंद असल्याची खात्री करून प्रमाणपत्र द्यावे लागणार आहे. त्यानंतर परिमंडळीय पोलिस उपायुक्त आणि अपर पोलिस आयुक्तांनाही टप्प्याटप्प्याने प्रमाणपत्रे सादर करावी लागणार आहेत.

फुगेवाडी दारूकांडात १७ नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. या घटनेमुळे शहराचीच नव्हे तर संपूर्ण पोलिस यंत्रणेची प्रतिमा मलिन झाली. त्यामुळे पोलिस प्रशासनाला कठोर पावले उचलण्याची गरज निर्माण झाली होती.

पोलिस आयुक्तालयाच्या नव्या आदेशामुळे पोलिस ठाणे, विभाग, परिमंडळ आणि प्रादेशिक स्तरावर उत्तरदायित्वाची साखळी निर्माण होणार आहे. कोणत्याही स्तरावर दुर्लक्ष झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर थेट जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.

फुगेवाडी दारूकांडानंतर पोलिस प्रशासनाने उचललेले हे सर्वांत महत्त्वाचे प्रशासकीय पाऊल मानले जात आहे.

हद्दीतील सर्व प्रकारचे अवैध धंदे बंद करण्याबाबत यापूर्वीही स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. मात्र, त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे समोर आल्याने जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते. यापुढे अवैध धंद्यांबाबत कोणतीही कुचराई किंवा दुर्लक्ष खपवून घेतले जाणार नसल्याचे पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी स्पष्ट केले आहे.

# थिंकटेक इंडियाच्या सीईओला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आकर्षक पगाराची नोकरी आणि व्यावसायिक प्रशिक्षणाचे आमिष दाखवत तरुणांकडून लाखो रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी थिंकटेक इंडिया ओपीसी लिमिटेड कंपनीचा मुख्य कार्यकारी अधिकारी हर्षल भानुदास ठाकरे याला हिंजवडी पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने त्याला ९ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणी कंपनीचे प्रशिक्षण विभागप्रमुख धुविल पारेख, मानव संसाधन विभागप्रमुख सौम्या सिंग तसेच इतर संबंधितांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध सुरू आहे. याबाबत सौरव राजन नायर (वय २५, रा. देहूरोड) यांनी हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सप्टेंबर २०२५ ते १ जून २०२६ या कालावधीत हिंजवडी फेज-२ येथील गेरा इम्पेरिअम राईजमधील कंपनीच्या कार्यालयातून संगनमताने हा प्रकार घडल्याचे तपासात समोर आले आहे.

आरोपींनी नोकरीच्या शोधात असलेल्या युवकांना आकर्षक वेतनाची नोकरी तसेच व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचे आमिष दाखविले. कंपनीमध्ये ट्रेनी म्हणून नियुक्ती देताना लॅपटॉप, प्रशिक्षण साहित्य आणि इतर सुविधांच्या नावाखाली प्रत्येकी १५ हजार रुपयांची अनामत रक्कम जमा करून घेतली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### सार्वजनिक मालमत्तांवर चोरट्यांचा डल्ला

**लोणी काळभोर** : हवेली तालुक्यातील कुंजीरवाडी ग्रामपंचायतीच्या मालकीच्या सार्वजनिक मालमत्तांवर अज्ञात समाजकंटकांकडून सातत्याने चोरी आणि तोडफोडीच्या घटना घडत असल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. ग्रामपंचायतीच्या कचरा संकलन वाहनाची बॅटरी चोरीला गेल्यानंतर प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेत लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ग्रामपंचायतीने दिलेल्या माहितीनुसार, १ जून रोजी कचरा संकलनासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनाची बॅटरी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. यापूर्वीही गावातील विविध ठिकाणी बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे साहित्य, स्ट्रीट लाईटच्या ट्यूब तसेच इतर सार्वजनिक साहित्य चोरी करून किंवा फोडून नुकसान करण्यात आले आहे. सतत घडणाऱ्या या घटनांमुळे ग्रामपंचायतीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून ग्रामस्थांमध्येही संतापाची भावना निर्माण झाली आहे.

### मोजणीच्या वादातून महिला व मुलाला दांडक्याने मारहाण

**दौंड** : जमिनीच्या मोजणीच्या वादातून एका महिलेसह तिच्या मुलाला लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना बोरीपार्धी (ता. दौंड) येथे घडली. या प्रकरणी यवत पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुनम सॅम्युअल वाघमारे (वय ४६, रा. बेथेल कॉलनी, बोरीपार्धी, ता. दौंड) यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सॅमसन जॉन वाघमारे (रा. रेल्वे स्टेशनजवळ, बोरीपार्धी, ता. दौंड) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोजणीवरून दोन्ही पक्षांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर भांडणात झाल्यानंतर आरोपीने फिर्यादी महिला आणि तिच्या मुलाला लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचा आरोप आहे.

## पावसाअभावी शेतीची कामे रखडली

# शेतकऱ्यांच्या नजरा मृग नक्षत्राकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी-धामणी परिसरासह शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील कान्हूर मेसाई परिसरात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतीची कामे रखडली आहेत. पावसाने लवकर हजेरी लावली नाही तर शेतकऱ्यांचे संपूर्ण वर्षाचे नियोजन बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे लक्ष आता ८ जूनपासून सुरू होणाऱ्या मृग नक्षत्राकडे लागले आहे.

सध्या अधिक मास सुरू असून गेल्या दोन दिवसांत तालुक्यातील मंचर, कळंब आणि घोडेगाव परिसरात काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली आहे. मात्र, लोणी-धामणी आणि कान्हूर मेसाई परिसरात अद्याप अपेक्षित पाऊस झालेला नाही. अधिक मासात कधी चांगला पाऊस पडतो तर कधी पावसाची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे यंदा मृग नक्षत्रातील पावसाकडून शेतकऱ्यांना मोठ्या अपेक्षा आहेत.

आंबेगाव आणि शिरूर तालुक्यांत खरीप हंगामात भुईमूग, बाजरी, मूग, कांदा, सोयाबीन, बटाटा तसेच विविध भाजीपाला पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. सध्या शेतकरी खरीप हंगामासाठी पूर्वमशागतीची कामे करत असून पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. यावर्षी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या अवकाळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते. त्यानंतर आता वेळेवर पाऊस पडेल का, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील तसेच शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील अनेक शेतजमिनी पावसाअभावी ओसाड दिसू लागल्या आहेत. या भागात पाणीटंचाईचेही सावट निर्माण झाले आहे. अनेक गावांमध्ये जलजीवन मिशनअंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करून पाणीपुरवठा योजना राबविण्यात आल्या असल्या तरी काही ठिकाणी आजही पाण्याच्या टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.

खरीप हंगामातील पेरणी वेळेत झाल्यास पिकांची वाढ चांगली होते आणि पुढील सर्व शेतीकामे नियोजनानुसार पार पडतात. मात्र, पावसाला उशीर झाल्यास पेरणी लांबण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होऊ शकतो. याशिवाय पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सध्या शेतकऱ्यांनी शेतीची पूर्वतयारी पूर्ण केली असून ते पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. वेळेवर आणि समाधानकारक पाऊस झाल्यास शेतकऱ्यांसमोरील अनेक अडचणी दूर होतील. अन्यथा शेतीचे संपूर्ण वर्षाचे गणित कोलमडण्याची शक्यता असल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

## श्रींच्या वडगाव काशिंबेगच्या अर्धपीठ चरणी भाविकांची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : अधिक महिन्यात आलेल्या संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथील श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थानात भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. अधिक महिन्यातील संकष्टीचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्ह्यासह विविध भागांतून आलेल्या भाविकांमुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

संकष्टी चतुर्थीनिमित्त बुधवारी दिवसभर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे पुजारी जगदीश जोशी यांच्या हस्ते महापूजा पार पडली. त्यानंतर भाविकांच्या उपस्थितीत अभिषेक करण्यात आला. सकाळी सात वाजता आरती झाल्यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. सकाळपासूनच भाविकांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. दुपारच्या सुमारास उन्हाचा कडाका वाढल्याने गर्दी काहीशी कमी झाली. मात्र, दुपारनंतर पुन्हा भाविकांची संख्या वाढली. दूरदूरवरून आलेल्या भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची तसेच प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. दुपारी तीन वाजता आरती पार पडली, तर सायंकाळी सात वाजता मुख्य आरती उत्साहात संपन्न झाली. उपस्थित एका भाविकाला श्रींच्या आरतीचा मान देण्यात आला.

चंद्रोदयानंतर श्री गणरायांना नैवेद्य अर्पण करण्यात आला. दरम्यान, पेशवेकालीन अर्धपीठ गणपती मंदिराची उद्योजक श्यामभाऊ गुंजाळ यांच्या वतीने आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. नरेंद्र पापा घुले यांच्या वतीने भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच मोरया मंगल कार्यालयाचे सुमित लांडे यांच्या वतीने भाविकांना खिचडीचा महाप्रसाद वाटप करण्यात आला. दिवसभर मंदिर परिसरात भाविकांची मोठी वर्दळ होती. अनेकांनी नवसपूर्ती करत गणरायाचे दर्शन घेतले.

## भावाअभावी कांदा उत्पादकांचा आक्रोश

# दागिने गहाण ठेवून कांदा लागवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी** : राज्यात पुन्हा एकदा कांदा प्रश्न ऐरणीवर आला असून उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा अत्यल्प बाजारभाव पाहता कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. कांद्याला मिळणारा दर उत्पादन खर्चही भरून काढत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील गंगापूर येथील महिला शेतकरी सीता ज्ञानेश्वर ठोसर यांनी कांदा पिकवण्यासाठी स्वतःचे दागिने गहाण ठेवावे लागल्याची व्यथा मांडली आहे. वाढते बियाणे, खते, औषधे आणि मजुरीचे दर यामुळे कांदा उत्पादनाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, बाजारात मिळणारा भाव अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कांद्याचे दर वाढले की ग्राहकांच्या हिताचा विचार केला जातो. मात्र, दर कोसळल्यानंतर शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानीकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे कांदा उत्पादकांमध्ये असंतोष वाढत असून उत्पादन खर्चावर आधारित हमीभावाची मागणी जोर धरू लागली आहे.

कांद्याच्या दरातील चढ-उतारांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन कोलमडत आहे. मोठी गुंतवणूक करून पीक घेतल्यानंतरही योग्य दर मिळत नसल्याने अनेक शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. त्यातच अवकाळी पाऊस, गारपीट आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे. महिला शेतकरी सीता ज्ञानेश्वर ठोसर आणि लोणी येथील शेतकरी बाबाजी वाळूंज यांनी शासनाने कांदा उत्पादकांना किमान हमीभाव द्यावा, अशी मागणी केली आहे. उत्पादन खर्च आणि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन कांद्यासाठी स्थिर आणि लाभदायक दर धोरण राबविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे.

# चक्रीवादळासह गारपिटीचा तडाखा

## कांदा उत्पादकांचे मोठे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील चांडोली बुद्रुक-खडकी परिसरात मंगळवारी दुपारी चक्रीवादळासह झालेल्या जोरदार गारपिटीने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे कांदा साठवणुकीसाठी उभारलेल्या अनेक बराक्यांमध्ये पाणी शिरल्याने हजारो क्विंटल कांदा भिजला असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी कांदा साठवणुकीसाठी लाकडी बराक्या उभारल्या आहेत. या बराक्यांवर शेडनेट आणि वैरणीचे आच्छादन करण्यात आले होते. मात्र, चक्रीवादळाच्या वेगवान वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी शेडनेट उडून गेले किंवा फाटले. त्यानंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे बराक्यांमध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणात कांदा भिजला.

खडकी फाटा येथील शेतकरी सुरेश दामोदर वाबळे यांनी त्यांच्या लाकडी बराकीत सुमारे ४०० कांद्याच्या पिशव्या साठवून ठेवल्या होत्या. मात्र, वादळी वाऱ्यामुळे बराकीवरील शेडनेट उडून गेल्याने पावसाचे पाणी थेट कांद्यावर पडले. परिणामी संपूर्ण साठवलेला कांदा भिजून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. भिजलेल्या कांद्याची गुणवत्ता घसरण्याबरोबरच तो सडण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

यंदाचा हंगाम कांदा उत्पादकांसाठी आधीपासूनच अडचणीचा ठरत आहे. उत्पादन खर्चात वाढ झाली असताना कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. त्यातच अवकाळी पाऊस, गारपीट आणि चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीमुळे अडचणींमध्ये आणखी भर पडली आहे. कमी बाजारभाव, वाढता उत्पादन खर्च आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे कांदा उत्पादक दुहेरी संकटात सापडले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी केली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून कांद्याला समाधानकारक बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच चक्रीवादळासह झालेल्या पावसामुळे साठवलेला कांदा भिजून नुकसान वाढले आहे. त्यामुळे कांदा उत्पादकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली असून शासनाकडून तातडीच्या मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# धरणांतील पाणीसाठ्यात लक्षणीय घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राज्यातील धरणांमधील पाणीसाठा पावसाळ्यापूर्वी चिंतेचा विषय ठरू लागला आहे. राज्यातील लहान, मध्यम आणि मोठ्या अशा एकूण ३ हजार २८ धरणांमध्ये सध्या केवळ ४००.८३ टीएमसी म्हणजेच २७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गतवर्षी याच कालावधीत हा साठा ४३३.२९ टीएमसी अर्थात ३० टक्के होता. त्यामुळे यंदा राज्यातील धरणांमध्ये सुमारे ३२.४५ टीएमसीने, म्हणजेच तीन टक्क्यांनी कमी पाणीसाठा उपलब्ध असल्याचे चित्र समोर आले आहे.

एल निनोचा प्रभाव, वाढते तापमान आणि यंदाच्या पावसाबाबत व्यक्त करण्यात आलेली अनिश्चितता यामुळे जलसाठ्याची परिस्थिती चिंताजनक मानली जात आहे. सध्या उपलब्ध पाणी पिण्यासाठी तसेच सिंचनासाठी वापरले जात असून वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने जलव्यवस्थापनाचे महत्त्व आणखी वाढले आहे.

या पार्श्वभूमीवर ३१ ऑगस्टपर्यंत राज्यातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित विभागांना आवश्यक पाणी आरक्षण सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, राज्यातील प्रमुख धरणांपैकी जायकवाडी धरणातील साठा काहीसा दिलासादायक आहे. मे महिन्यात साठ्यात ७.२८ टीएमसीची घट झाली असली तरी तो अद्याप गतवर्षीच्या तुलनेत २.४० टीएमसीने अधिक आहे. सध्या जायकवाडी धरणात २५.१७ टीएमसी म्हणजे ३२.८३ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. राज्याच्या ऊर्जा आणि सिंचन व्यवस्थेसाठी महत्त्वाच्या असलेल्या कोयना धरणात अवघा १०.७५ टीएमसी म्हणजे १०.७४ टक्के उपयुक्त साठा शिल्लक आहे. पावसाळा उशिरा सुरू झाल्यास किंवा कमी पाऊस झाल्यास त्याचा परिणाम वीजनिर्मिती आणि सिंचनावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उजनी धरणाची स्थिती आणखी चिंताजनक असून तेथे उपयुक्त साठा उणे ११.४८ टीएमसी इतका नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे भीमा खोऱ्यातील पाणी उपलब्धतेबाबत चिंता वाढली आहे.

विभागनिहाय पाहता अमरावती विभागात ४०.८३ टक्के आणि नागपूर विभागात ३८.३६ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. कोकण विभागात ३३.७२ टक्के, छत्रपती संभाजीनगर विभागात ३०.३४ टक्के आणि नाशिक विभागात २८.७७ टक्के साठा आहे. पुणे विभागात १८.१२ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून राज्यातील सर्व महसुली विभागांमध्ये ही सर्वात कमी पातळी आहे.

तज्ज्ञांच्या मते, पावसाळा सुरू होईपर्यंत उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. विशेषतः पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे.

# दोन चिमुकल्यांसह विवाहितेची विहिरीत उडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील गोहे बुद्रुक येथील वाळकोळी वाडीत दोन लहान मुलांसह एका महिलेने विहिरीत उडी घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी उघडकीस आली. या घटनेत आईसह दोन्ही चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

अश्विनी तानाजी वाळकोळी (वय २८), अक्षदा तानाजी वाळकोळी (वय ५) आणि कार्तिक तानाजी वाळकोळी (वय ३) अशी मृतांची नावे आहेत.

याबाबत घोडेगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोहे बुद्रुक येथील करबंदेदरा वाळकोळी वाडीत बुधवारी सायंकाळी चार ते सहा वाजण्याच्या दरम्यान गावकीच्या विहिरीत तिघांचे मृतदेह आढळून आले. प्राथमिक माहितीनुसार, अश्विनी वाळकोळी यांनी आपल्या दोन मुलांसह विहिरीत उडी घेतल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून महिलेने हे टोकाचे पाऊल का उचलले, याबाबत माहिती समोर आलेली नाही.

घटनेची माहिती मिळताच घोडेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक महेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष मुळूक, हरिभाऊ नलावडे, पोलीस हवालदार जालिंदर राहणे, भाऊसाहेब कोरके, वैभव आंधळे, अनिल भोईर तसेच होमगार्ड अक्षय पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. विहिरीतून तिघांनाही बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना घोडेगाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती तिघांनाही मृत घोषित केले. या प्रकरणी घोडेगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# पीएम सूर्यघर वीज योजनेचा शुभारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर** : केंद्र शासनाच्या पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेचा शुभारंभ खेडचे आमदार बाबाजी रामचंद्र काळे यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आला. खेड विधानसभा मतदारसंघातील अधिकाधिक नागरिकांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी आमदार काळे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे.

पाडळी येथील आमदार बाबाजी काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी बोलताना आमदार काळे यांनी वाढत्या वीज खर्चावर उपाय म्हणून सौरऊर्जेचा वापर करण्याचे आवाहन केले. २५ वर्षांच्या हमीसह उपलब्ध असलेल्या सोलर पॅनल प्रणालीमुळे नागरिकांना वीजबिलातून मोठी बचत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.केंद्र शासनाच्या या योजनेअंतर्गत शून्य रुपये डाऊन पेमेंट सुविधा, १ किलोवॅट ते ३ किलोवॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रणाली तसेच शासनाकडून मिळणारे अनुदान याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहितीही यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमास पंचायत समितीच्या सभापती विद्याताई मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास धनवटे, जिल्हा परिषद सदस्य गणेश आरगडे, जिल्हा परिषद सदस्या दिप्तीताई भोगाडे, संजय घनवट, पंचायत समिती सदस्य दिलीप डुबे, प्रसाद घेनंद, कविता राक्षे, सारिका गोगावले, माजी उपसभापती ज्योतीताई आरगडे, जीवन खराबी, किरण गवारे, किरण लोखंडे, सयाजी मोहिते, सतीश चांभारे, दत्ता सातपुते, संतोष राक्षे, रुपेश आरगडे, महेश शेटे, देवराम वाडेकर, सचिन गावडे यांच्यासह विविध गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मतदारसंघातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार बाबाजी काळे सातत्याने प्रयत्नशील असल्याची भावना उपस्थित मान्यवर आणि नागरिकांनी व्यक्त केली.

## उन्हाळ्यात कालव्याचे आवर्तन वेळेवर मिळाले नाही...

# पाणी न मिळाल्याने शेकडो एकर ऊस जळाला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर** : इंदापूर तालुक्याच्या पश्चिम भागातील खडकवासला उजव्या कालव्याखालील शेकडो एकर ऊस पाण्याअभावी जळून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. उन्हाळ्यात कालव्याचे आवर्तन वेळेवर न मिळाल्याने ऊस पिके वाळून गेली असून शेतकरी हवालदिल झाले आहेत.

तरंगवाडी, कौठळी, न्हावी, रुई, कळस, अकोले, पिंपळे, शेटफळगडे आणि निरगुडे परिसरातील हजारो एकर ऊस शेती खडकवासला उजव्या कालव्याच्या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र, गेल्या तीन महिन्यांपासून कालव्याचे नियमित आवर्तन न मिळाल्याने पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांची ऊस पिके जळून गेली आहेत.

यंदा अवकाळी आणि मान्सूनपूर्व पावसानेही दडी मारल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. शेतीसह पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला असून अनेक गावांमध्ये पाणीटंचाईचे सावट गडद झाले आहे. मोठा खर्च करून जोपासलेली ऊस पिके डोळ्यादेखत वाळून जात असल्याने शेतकऱ्यांना मोठा मानसिक आणि आर्थिक फटका बसला आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, १२ मे रोजी कालव्याला उन्हाळी आवर्तन सोडण्यात आले होते. मात्र हे पाणी कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पोहोचलेच नाही. हेडपासून टेलपर्यंत पाणी पोहोचण्यापूर्वीच आवर्तन बंद करण्यात आल्याने शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना पाण्याचा लाभ मिळू शकला नाही. वेळेवर पाणी मिळाले असते तर ऊस पिके वाचली असती आणि नुकसान टळले असते, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी निरगुडे येथील सामाजिक कार्यकर्ते भगवान बापू खारतोडे यांनी २ जूनपासून कळस येथील तलाठी कार्यालयासमोर भर उन्हात उपोषण सुरू केले आहे. जळालेल्या ऊस पिकांसाठी शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्यात यावी, संबंधित गावांच्या पाणीपुरवठा योजनांचे तलाव खडकवासला कालव्याच्या पाण्याने भरून द्यावेत तसेच १२ मे रोजी सोडलेले आवर्तन शेवटपर्यंत न पोहोचण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या वाढत्या अडचणी आणि पाण्याच्या तीव्र टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातून होत आहे.

# झाड कोसळल्याने ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील चांडोली बुद्रुक येथे मंगळवारी दुपारी झालेल्या वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने मोठे नुकसान झाले. वादळापासून बचाव करण्यासाठी शेडमध्ये थांबलेल्या एका ज्येष्ठ नागरिकावर झाड कोसळल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर दोन महिला जखमी झाल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी अचानक आलेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे चांडोली बुद्रुक परिसरात मोठ्या प्रमाणावर झाडे उन्मळून पडली. या दरम्यान हरिभाऊ रघुनाथ थोरात (वय ७०) हे पावसापासून संरक्षणासाठी रस्त्यालगत असलेल्या एका शेडमध्ये थांबले होते. मात्र, वादळी वाऱ्याच्या जोरामुळे शेडवर मोठे झाड कोसळले. झाडासह शेड अंगावर पडल्याने हरिभाऊ थोरात यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत त्यांच्यासोबत निवाऱ्यासाठी उभ्या असलेल्या सुलाबाई काशिनाथ सुकाळे (वय ७५) यांच्या हाताला दुखापत झाली असून शांता अर्जुन थोरात (वय ५५) यांच्या पायाला दुखापत झाली.

दरम्यान, चांडोली बुद्रुक, पाचघर वस्ती आणि चांडोली खुर्द परिसरात वादळामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने काही काळ रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले होते.

## सारांश वृत्त

### अमली पदार्थ तस्कराचे घर उद्ध्वस्त

**श्रीनगर :** एका अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या व्यक्तीचे तीन मजली घर गुरुवारी पाडून टाकण्यात आले. महसूल विभागाच्या समन्वयाने श्रीनगर पोलिसांनी रैनावारीतील मुमखन मोहल्ला येथील ड्रग्ज पेडलर शेख तसादुक यांचे बांधकाम जमीनदोस्त केले. या इमारतीची किंमत दोन कोटी रुपये होती, असे प्रवक्त्याने सांगितले.



### राहुल गांधी यांचा दौरा हवामानामुळे रद्द

**डेहराडून :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांना गुरुवारी उत्तराखंडमधील अल्मोडा दौरा स्थगित करावा लागला आणि त्यांच्या हेलिकॉप्टरला खराब हवामानाचा सामना करावा लागला. लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस सरचिटणीस आणि उत्तराखंड प्रभारी कुमारी शैलजा यांच्या दूरध्वनीवरून 'परिवर्तन का शंखनाद' या जाहीर सभेत भाषण केले. राहुल यांनी दूरध्वनीवरून केलेल्या भाषणाचा बराचसा भाग स्पष्टपणे ऐकू येत नसला तरी कार्यक्रमस्थळी पोहोचू न शकल्याबद्दल त्यांनी अल्मोडा येथे जमलेल्या लोकांची माफी मागितली आणि लवकरच पुन्हा भेट देण्याचे आश्वासन दिले.

### नवीन बाबू मृत्यूप्रकरणी सीबीआय चौकशीची केली शिफारस

**तिरुवनंतपुरम :** केरळमधील यूडीएफ सरकारने गुरुवारी कन्नूरचे एडीएम नवीन बाबू यांच्या 2024 मध्ये झालेल्या मृत्यूच्या सभोवतालच्या परिस्थितीची सीबीआय चौकशी करण्याची शिफारस केली. मुख्यमंत्री व्ही. डी. सतीसन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सतीशन म्हणाले की, दिवंगत नवीन बाबू यांच्या पत्नीने सादर केलेल्या निवेदनाचा विचार करून मंत्रिमंडळाने केंद्र सरकारला सीबीआय चौकशीची शिफारस केली होती.

## २० हजार कोटी रुपयांहून अधिकची ऑर्डर शक्य

# स्वदेशी ड्रोन खरेदीसाठी मोठी तयारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतीय लष्कराच्या आधुनिकीकरणाला गती देण्यासाठी केंद्र सरकार देशांतर्गत उत्पादकांकडून दोन अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक मूल्याचे लष्करी ड्रोन खरेदी करण्याच्या तयारीत आहे. मानवरहित हवाई यंत्रणांच्या क्षेत्रातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी स्वदेशी खरेदी ठरण्याची शक्यता असून यामुळे सशस्त्र दलांची ऑपरेशनल क्षमता अधिक बळकट होणार आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या खरेदीसंदर्भातील प्रक्रिया प्रगत टप्प्यात असून पुढील १८ ते २४ महिन्यांत ड्रोनचे वितरण पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. यापूर्वी सुमारे ३ हजार कोटी रुपयांच्या टॅक्टिकल श्रेणीतील ड्रोन खरेदी करण्यात आली होती. मात्र, प्रस्तावित नवीन ऑर्डर त्यापेक्षा अनेक पटींनी मोठी असणार



आहे. आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांच्या अहवालानुसार, आगामी खरेदीची किंमत २० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक असू शकते. तातडीच्या लष्करी गरजा लक्षात घेऊन ही खरेदी जलदगती अधिग्रहण प्रक्रियेद्वारे करण्यात येण्याची शक्यता आहे.

रशिया-युक्रेन युद्ध तसेच पश्चिम आशियातील संघर्षांमध्ये ड्रोनच्या वाढत्या वापरामुळे आधुनिक युद्धपद्धतीत त्यांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. टेहळणी, गुप्त माहिती संकलन, अचूक लक्ष्यभेदन आणि युद्धसामग्री वाहतुकीसाठी ड्रोन अत्यंत प्रभावी ठरत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जगभरातील लष्करे मानवरहित तंत्रज्ञानाचा वेगाने स्वीकार करत आहेत.

भारताच्या संरक्षण धोरणावरही पाकिस्तानसोबत अलीकडे झालेल्या तणावाचा प्रभाव पडला आहे. या संघर्षादरम्यान दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर ड्रोनचा वापर केल्यामुळे आक्रमक आणि बचावात्मक कारवायांमध्ये या तंत्रज्ञानाचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले आहे.

ड्रोन खरेदीचे प्रमाण आतापर्यंतच्या सर्व खरेदींपेक्षा मोठे असेल. भारतीय सशस्त्र दल विविध प्रकारच्या मोहिमांसाठी ड्रोनचा वापर वाढवत असून त्यासाठी वेगवान खरेदी प्रक्रियेचा अवलंब केला जात आहे.

ही खरेदी केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर भारत आणि संरक्षण क्षेत्रातील स्वदेशी उत्पादन वाढविण्याच्या धोरणाशी सुसंगत मानली जात आहे. सध्या देशात ड्रोन आणि त्यांचे सुटे भाग तयार करणाऱ्या ६०० हून अधिक कंपन्या कार्यरत आहेत. यामध्ये मोठ्या संरक्षण कंपन्यांसह अत्याधुनिक मानवरहित तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या स्टार्टअप्सचाही समावेश आहे.

सरकारच्या धोरणात्मक सुधारणांमुळे आणि प्रोत्साहनात्मक योजनांमुळे देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढली असून या क्षेत्रात गुंतवणूकही वाढत आहे. त्यामुळे भारतीय उद्योग वाढत्या लष्करी मागणीची पूर्तता करण्यास सक्षम होत असल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, मार्च महिन्यात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या बैठकीत सुमारे २.३८ लाख कोटी रुपयांच्या संरक्षण खरेदी प्रस्तावांना आवश्यक मंजुरी देण्यात आली होती. त्याच व्यापक आधुनिकीकरण मोहिमेचा भाग म्हणून या मोठ्या ड्रोन खरेदीकडे पाहिले जात असून यामुळे भारतीय सशस्त्र दलांच्या टेहळणी, गुप्तचर आणि लक्ष्यभेदन क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे.

## नरेंद्र मोदी सरकारवर काँग्रेसी खर्गे यांचा निशाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या निष्कर्षांवरून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी गुरुवारी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. आरोग्य आणि पोषणाच्या बाबतीत मोदी सरकारने देशातील महिला आणि मुलांचा विश्वासघात केल्याचा आरोप करत त्यांनी भाजपच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

एनएफएचएस-६ च्या आकडेवारीचा हवाला देत खर्गे यांनी सांगितले की, देशातील पाचपैकी एक बालक तीव्र कुपोषणाचा सामना करत आहे. तसेच एक तृतीयांश मुलांचे वजन कमी असून ६ ते २३ महिने वयोगटातील ८४ टक्क्यांहून अधिक मुलांना पुरेसे पोषण मिळत नाही. याशिवाय १५ ते ४९ वयोगटातील ५७ टक्के महिला रक्तक्षयाने ग्रस्त आहेत, तर पाचपैकी एक महिला कुपोषित असल्याचे त्यांनी नमूद केले. समाज माध्यमावरील आपल्या संदेशात खर्गे यांनी आरोप केला की, केंद्र सरकार केवळ आरोग्य आणि पोषणाच्या बाबतीत अपयशी ठरलेले नाही, तर या अपयशाची माहिती समोर येऊ नये यासाठी महत्त्वाचा डेटा जाणीवपूर्वक दडपण्याचाही प्रयत्न करत आहे. भाजप सरकार आपले अपयश झाकत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने २०२३-२४ मध्ये केलेल्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या सहाव्या फेरीतील निष्कर्ष नुकतेच जाहीर केले आहेत. यात देशातील ७१५ जिल्ह्यांमधील सुमारे ६.७९ लाख कुटुंबांचा समावेश करण्यात आला होता. लोकसंख्या, आरोग्य, पोषण आणि कुटुंब कल्याणाशी संबंधित विविध निर्देशांकांची माहिती या सर्वेक्षणातून संकलित करण्यात आली आहे.

दरम्यान, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, देशाने बालआरोग्य क्षेत्रात प्रगती केली असून लसीकरणाचे प्रमाण वाढले आहे. तसेच पोषणाशी संबंधित निर्देशांकांमध्ये सुधारणा दिसून आली आहे.

## लेबनॉनमध्ये इस्रायली हवाई हल्ले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेरूत :** इस्रायल आणि लेबनॉन यांच्यात सशर्त युद्धविराम लागू करण्याबाबत वॉशिंग्टनमध्ये सहमती झाल्याची घोषणा होताच दक्षिण लेबनॉनमध्ये इस्रायलने हवाई हल्ले केल्याची माहिती लेबनॉनच्या सरकारी माध्यमांनी दिली आहे. त्यामुळे युद्धविरामाच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लेबनॉनच्या वृत्तानुसार, दक्षिणेकडील अनेक भागांमध्ये रस्त्यांवर ड्रोन हल्ले करण्यात आले. या हल्ल्यांमध्ये किमान एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

दरम्यान, इस्रायली लष्कराने उत्तर इस्रायलमध्ये हवाई हल्ल्याच्या इशाऱ्याचे सायरन वाजल्याची माहिती दिली. संशयास्पद हवाई लक्ष्याशी संबंधित एका घटनेचे निराकरण करण्यात आले असून दुसरा इशारा खोटा असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

वॉशिंग्टनमध्ये बुधवारी झालेल्या चर्चेनंतर इस्रायल आणि लेबनॉनने युद्धविराम लागू करण्यास तत्त्वतः सहमती दर्शविली. मात्र, इराण समर्थित हिजबुल्लाह संघटनेने सर्व प्रकारचा गोळीबार पूर्णपणे थांबवणे आवश्यक असल्याची अट इस्रायलने घातली आहे. या करारानुसार दोन्ही बाजूंनी एका विशेष पायलट क्षेत्राच्या निर्मितीस मान्यता दिली आहे. या क्षेत्रात लेबनॉनचे सशस्त्र सैन्य पूर्ण नियंत्रण ठेवेल आणि कोणत्याही बिगर-सरकारी सशस्त्र गटाला तेथे कार्य करण्याची परवानगी दिली जाणार नाही. इस्रायलचे राष्ट्रीय सुरक्षा मंत्री इतामार बेन ग्विर यांनी या करारावर टीका करत हा निर्णय गंभीर चूक असल्याचे म्हटले आहे.


युद्धविरामाच्या घोषणेपूर्वी हिजबुल्लाहने दक्षिण लेबनॉनमधील क्वांतारा परिसरात इस्रायली सैनिक आणि लष्करी वाहनांवर रॉकेट हल्ले केल्याचा दावा केला. तसेच ब्यूफोर्ट किल्ल्याजवळील लष्करी तळावर ड्रोन हल्ले करण्यात आल्याचेही संघटनेने म्हटले आहे.

## राहुल गांधींचा मोदी सरकारवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नीट-यूजी परीक्षेतील कथित अनियमितता आणि पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीच्या घटनेवरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. मध्य प्रदेशातील मौगंज जिल्ह्यातील आकांक्षा चतुर्वेदी या नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थिनीने नागपूर येथे आत्महत्या केल्यानंतर राहुल गांधी यांनी सामाजिक माध्यमांवर प्रतिक्रिया व्यक्त केली.

राहुल गांधी यांनी आपल्या संदेशात आकांक्षाचे डॉक्टर होण्याचे



स्वप्न आणि त्यासाठी तिच्या कुटुंबाने घेतलेले कष्ट अधोरेखित केले. आकांक्षाचे वडील शेतकरी असून मुलीचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांनी किसान क्रेडिट कार्डवर तीन लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. तसेच नागपुरात स्वयंपाकी म्हणून काम करून मुलीच्या कोचिंगचा खर्च उचलला होता, असे त्यांनी नमूद केले.

एका वडिलांनी आपल्या मुलीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले. मात्र, नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, परीक्षा रद्द होणे आणि त्यातून निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या वातावरणात आकांक्षाने जीवन संपवले, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

आकांक्षाचा मृत्यू ही केवळ आत्महत्या नसून शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी आणि भ्रष्टाचाराचा परिणाम असल्याचा आरोपही त्यांनी केला. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावरही त्यांनी निशाणा साधत, आजही त्याच चौकशा, त्याच समित्या आणि तीच प्रशासकीय पद्धत सुरू असल्याची टीका केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, सत्ता कायमस्वरूपी नसते; मात्र गेल्या बारा वर्षांत शिक्षण व्यवस्थेचे मोठे नुकसान झाले असून त्याची किंमत देशातील तरुण पिढीला मोजावी लागत आहे.

दरम्यान, नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून घेण्यात आलेली नीट-यूजी २०२६ परीक्षा ३ मे रोजी पार पडली होती. पेपरफुटीच्या आरोपांनंतर १२ मे रोजी ही परीक्षा रद्द करण्यात आली. या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडून सुरू असून २१ जून रोजी फेरपरीक्षा घेण्यात येणार आहे.

## विवाहित मुलगी माहेरच्या कुटुंबाची सदस्यच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लग्नानंतर मुलगी तिच्या माहेरच्या कुटुंबाची सदस्य राहत नाही, हे गृहीतक केवळ लैंगिक रूढीवादी मानसिकतेवर आधारित असून राज्यघटनेतील समानतेच्या तत्त्वाशी विसंगत आहे, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने हा निकाल देताना विवाहित मुलींना कुटुंबाच्या व्याख्येतून वगळणे हे घटनाबाह्य असल्याचे स्पष्ट केले.

हे प्रकरण उत्तर प्रदेशातील अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीशी संबंधित आहे. एका विवाहित महिलेने तिच्या दिवंगत आईच्या नावावरील रास्त भावाचे दुकान स्वतःकडे हस्तांतरित करण्याची मागणी केली होती. मात्र, उत्तर प्रदेश सरकारच्या २०१९ मधील आदेशानुसार विवाहित मुलगी कुटुंबाच्या व्याख्येत बसत नसल्याचे कारण देत अलाहाबाद उच्च न्यायालयाने तिची मागणी फेटाळली होती. त्यानंतर संबंधित महिलेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

निकालपत्रात न्यायालयाने स्पष्ट केले की, विवाहामुळे मुलगी आणि तिच्या माहेरच्या कुटुंबातील नाते संपुष्टात येत नाही. तसेच ती आता कुटुंबावर अवलंबून राहू शकत नाही, असे गृहीत धरणेही चुकीचे आहे. आजच्या सामाजिक वास्तवात अनेक विवाहित मुली आपल्या पालकांसोबत राहतात, त्यांना आर्थिक व सामाजिक आधार देतात किंवा काही प्रसंगी त्यांच्यावरच अवलंबून असतात, असे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने म्हटले की, विवाहित मुलगी माहेरच्या कुटुंबाची सदस्य राहत नाही किंवा ती कुटुंबावर अवलंबून नसते, हे गृहीतक घटनात्मकदृष्ट्या अमान्य आहे. विवाहामुळे मुलीचे तिच्या मूळ कुटुंबाशी असलेले नाते पुसले जात नाही.

## तामिळनाडूत एल अँड टीची १८,६०० कोटींची गुंतवणूक

# ८,२०० रोजगारांची निर्मिती अपेक्षित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** पायाभूत सुविधा क्षेत्रातील आघाडीची कंपनी लार्सन अँड टुब्रो (एल अँड टी) तामिळनाडूमध्ये डेटा सेंटर, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि जहाजबांधणी क्षेत्रात तब्बल १८,६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या गुंतवणुकीमुळे सुमारे ८,२०० नवीन रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत सचिवालयात तीन महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी उद्योगमंत्री एस. कीर्तना, मुख्य सचिव एम. साईकुमार, उद्योग सचिव विजय कुमार, गाईडन्स संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालक अलरमेल मंगाई तसेच एल अँड टीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक एस. एन. सुब्रह्मण्यन उपस्थित होते. या गुंतवणुकीतील सर्वात मोठा हिस्सा कांचीपुरम जिल्ह्यातील डेटा सेंटर व्यवसायाच्या विस्तारासाठी खर्च केला जाणार आहे. यासाठी कंपनी १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून क्लाऊड सेवा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा स्टोरेज पायाभूत सुविधांची वाढती मागणी पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे. कोईम्बतूर येथे इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रॉनिक प्रणाली उत्पादन प्रकल्पासाठी कंपनीकडून २,५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. या प्रकल्पातून सुमारे २ हजार रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तिरुवल्लूर जिल्ह्यातील कट्टुपल्ली येथील जहाजबांधणी संकुलाच्या विस्तारासाठी आणखी १,१०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. या विस्तार प्रकल्पामुळे सुमारे ५,७०० रोजगार उपलब्ध होणार आहेत.

कट्टुपल्ली प्रकल्पाच्या विस्तारामुळे ऑफशोअर पवनऊर्जा पुरवठा साखळीत तामिळनाडूचे स्थान अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. वाढीव फॅब्रिकेशन क्षमता आणि सागरी पायाभूत सुविधांमुळे या क्षेत्राला चालना मिळणार आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन प्रकल्पामुळे राज्यातील औद्योगिक परिसंस्था अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे.

राज्य सरकारने २०३६ पर्यंत तामिळनाडूची अर्थव्यवस्था १.५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा विस्तार आणि मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीमुळे एल अँड टीची ही गुंतवणूक त्या उद्दिष्टपूर्तीसाठी महत्त्वाची ठरणार असल्याचे मानले जात आहे.

## डीजीसीएची मंजुरी न नसल्याने विमान परतले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोपनहेगन :** तब्बल १७ वर्षांनंतर भारतात उड्डाण सेवा पुन्हा सुरू करणाऱ्या स्कँडिनेव्हियन एअरलाइन्सला पहिल्याच दिवशी मोठा अडथळा आला. कोपनहेगनहून मुंबईकडे रवाना झालेले एअरलाइन्सचे पहिले विमान आवश्यक नियामक मंजुरी न मिळाल्याने प्रवासाच्या मध्यावरून परत कोपनहेगनला वळवावे लागले.

स्कँडिनेव्हियन एअरलाइन्सचे एसके-९६९ हे एअरबस ए-३३० विमान मंगळवारी कोपनहेगनहून मुंबईकडे रवाना झाले होते. विमानाने सुमारे चार तासांचा प्रवास पूर्ण केला होता. अझरबैजानच्या हवाई क्षेत्राजवळ असताना कोपनहेगन हवाई वाहतूक नियंत्रण केंद्राकडून कॉकपिट कर्मचाऱ्यांना विमान परत वळविण्याच्या सूचना देण्यात आल्या. उड्डाणादरम्यान भारतीय विमान वाहतूक नियामक महासंचालनालयाकडून या सेवेसाठी आवश्यक अंतिम लेखी मंजुरी अद्याप मिळालेली नसल्याची माहिती विमानाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आली. नियमानुसार कोणत्याही आंतरराष्ट्रीय उड्डाणासाठी संबंधित परवानगी घेणे बंधनकारक असते. मात्र, ही मंजुरी वेळेत प्राप्त न झाल्याने विमानाला नियोजित गंतव्यस्थानाकडे जाता आले नाही.

दरम्यान, मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर या ऐतिहासिक उड्डाणाच्या स्वागतासाठी विशेष तयारी करण्यात आली होती. विमानाच्या आगमनानंतर पारंपरिक वॉटर कॅनन सलामी देण्यासाठी विमानतळ प्रशासन सज्ज होते. मात्र, विमान मुंबईत दाखल होणार नसल्याची माहिती नंतर विमानतळ अधिकाऱ्यांना मिळाली.

मुंबईच्या दिशेने चार तास उड्डाण केल्यानंतर विमानाने परतीचा प्रवास सुरू केला आणि आणखी चार तासांच्या उड्डाणानंतर ते सुरक्षितपणे कोपनहेगन विमानतळावर उतरले. त्यामुळे विमान जवळपास आठ तास हवेत राहिले. या घटनेबाबत स्कँडिनेव्हियन एअरलाइन्सने निवेदन जारी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून अपेक्षित अंतिम मंजुरी वेळेत मिळू शकली नसल्याचे स्पष्ट केले. विमान हवेत असतानाच मंजुरी मिळेल, अशी अपेक्षा पूर्ण न झाल्याने सेवा स्थगित करावी लागल्याचे कंपनीने म्हटले आहे.

## आयएनएस ऐरावतचे श्रीलंकेत स्वागत

**कोलंबो :** भारतीय नौदलाच्या ऐरावत या नौकेचे कोलंबो बंदरात पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. कोलंबो येथील भारतीय उच्चायुक्तांनी सांगितले की, आयएनएस ऐरावत भारत सरकारच्या अनुदानाद्वारे भारतीय तटरक्षक दलाकडून श्रीलंकेच्या तटरक्षक दलाच्या सुरक्षा जहाजासाठी महत्त्वाचे सुटे भाग घेऊन येत आहे. "भारतीय नौदलाच्या जहाजांच्या श्रीलंकेच्या भेटीचा उद्देश दोन्ही मैत्रीपूर्ण नौदलांमधील मजबूत संबंध अधिक दृढ करणे हा आहे.

## रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये भीषण आग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुजफ्फरपूर :** बिहारमधील मुजफ्फरपूर शहरात गुरुवारी पहाटे खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात लागलेल्या भीषण आगीत किमान तीन जणांचा मृत्यू झाला असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रसाद रुग्णालयातील आयसीयूमध्ये ही दुर्घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार अनेक रुग्ण आगीत गंभीररीत्या भाजल्याने दहा जणांपर्यंत मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र प्रशासनाने सध्या तीन मृत्यूंची अधिकृत पुष्टी केली आहे.

ही घटना गुरुवारी पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास घडली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. त्यानंतर बचावकार्य सुरू करण्यात आले.

या घटनेबाबत माहिती देताना जिल्हाधिकारी सुब्रत कुमार सेन यांनी सांगितले की, रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये आग लागल्यानंतर अनेक रुग्ण अडकले होते. अग्निशमन दलाने वेआग आटोक्यात आणली. तीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती उपलब्ध असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.माहितीनुसार, आयसीयूमध्ये घटनेच्या वेळी १५ रुग्ण उपचार घेत होते. त्यापैकी १३ रुग्णांची नोंद रुग्णालयाच्या अभिलेखांमध्ये आढळून आली आहे. काही गंभीर रुग्णांवर सीसीयूमध्ये उपचार सुरू होते. आगीतून बचावलेल्या रुग्णांना तातडीने अन्य रुग्णालयांमध्ये हलविण्यात आले आहे.

## पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला मोठी गळती

# ममता बॅनर्जी यांच्यासमोर अस्तित्व राखण्याचे आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्याचे चित्र समोर आले असून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासमोर पक्षाचे अस्तित्व टिकविण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. एकेकाळी विधानसभेत प्रबळ बहुमत असलेल्या तृणमूल काँग्रेसची संख्या आता ८० आमदारांवर आली असून पक्षातील बंडखोरीमुळे राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत आहेत.

निवडणुकीत भाजपकडून झालेल्या पराभवानंतर ममता



बॅनर्जी यांना आणखी एक मोठा धक्का बसला. त्यांचा दीर्घकाळचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या भवानीपूर मतदारसंघात त्यांचा पराभव झाला. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत २१५ जागा जिंकणाऱ्या तृणमूल काँग्रेसची ताकद काही वर्षांतच मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

दरम्यान, पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेले नेते ऋताब्रता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील असंतुष्ट गटाने विधानसभा अध्यक्षांकडे ५८ आमदारांच्या पाठिंब्याची पत्रे सादर केली आहेत. या आमदारांनी ऋताब्रता बॅनर्जी यांना विधिमंडळ पक्षनेते म्हणून समर्थन दर्शविले असून विरोधी पक्षनेतेपदावरही दावा केला आहे. या घडामोडींमुळे तृणमूल काँग्रेसच्या दोन तृतीयांशपेक्षा अधिक आमदारांनी ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वापासून फारकत घेतल्याचे संकेत मिळत आहेत.

काही दिवसांपूर्वी पक्षविरोधी कारवायांचा आरोप करत ऋताब्रता बॅनर्जी आणि संदीपन साहा यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती. मात्र, या निर्णयामुळे बंड शमण्याऐवजी अधिक तीव्र झाल्याचे दिसून येत आहे.

२०११ मध्ये डाव्या आघाडीची ३४ वर्षांची सत्ता उलथवून तृणमूल काँग्रेसने बंगालच्या राजकारणात नवे पर्व सुरू केले होते. त्यानंतर २०१६ मध्ये २११ आणि २०२१ मध्ये २१५ जागा जिंकत पक्षाने सर्वोच्च यश मिळविले. मात्र, अलीकडील घडामोडींमुळे पक्षाची राजकीय घसरण स्पष्टपणे दिसून येत आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, निवडणुकीतील पराभवानंतर पक्षात विघटन होणे अपेक्षित होते. पक्षाचे मूळ उद्दिष्ट डाव्या आघाडीला सत्तेतून दूर करणे हे होते. मात्र, त्यानंतर पक्षाला ठोस वैचारिक दिशा किंवा दीर्घकालीन विकासाचा स्पष्ट आराखडा देता आला नाही. त्यामुळे अनेक आमदार वैयक्तिक राजकीय हितसंबंधांच्या दिशेने वळल्याचे निरीक्षण नोंदविले जात आहे. पक्षावरील नियंत्रण पुन्हा मजबूत करण्यासाठी तृणमूल काँग्रेसने काही प्रमुख संघटनात्मक समित्या आणि आघाड्या विसर्जित केल्या आहेत. या निर्णयाकडे संभाव्य फूट रोखण्याचा शेवटचा प्रयत्न म्हणून पाहिले जात आहे.

ममता बॅनर्जी यांनी या परिस्थितीसाठी भाजपला जबाबदार धरले आहे. पैसा, अटक आणि दबावतंत्राचा वापर करून तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. भाजपने बंडखोर आमदारांना थेट पक्षात सामावून घेण्याची घाई दाखविलेली नाही. महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे मॉडेलप्रमाणे स्वतंत्र राजकीय गट उभा राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.